सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०४ ऑगस्ट २०२२

## ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सुमारे ७८ टक्के मतदान

मुंबई, दि. ४ (रा.नि.आ.): राज्यातील विविध १५ जिल्ह्यांमधील ६२ तालुकांत्यातील २३८ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांत प्राथमिक अंदाजानुसार आज सरासरी सुमारे ७८ टक्के मतदान झाले.

राज्य निवडणूक आयोगाने २७१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची २९ जून २०२२ रोजी घोषणा केली होती. त्यातील ३३ ग्रामपंचायतींच्या निवडणुका पूर्णत: तर काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका अशंत: बिनविरोध झाल्या आहेत. त्यामुळे आज प्रत्यक्षात २३८ ग्रामपंचायतींसाठी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळत मतदान झाले. सर्व ठिकाणी मतमोजणी ५ ऑगस्ट २०२२ रोजी होईल.

**मतदान झालेल्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या अशी: नाशिक**- ३६, **धुळे**- ४१, **जळगाव**- २०, **अहमदनगर**- १३, **पुणे**- १७, **सोलापूर**- २५, **सातारा**- ७, **सांगली**- १, **औरंगाबाद**- १६, **बीड**- १३, **परभणी**- २, **उस्मानाबाद**- ९, **जालना**- २७, **लातूर**- ६, आणि **बुलडाणा**- ५. **एकूण**- २३८.

(Jagdish More, SEC)